आर.सी.सी.क्र.९७/२०२४

नि.क्र. १५/क

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ तपासीअधिकारी</u>

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,</u>

.....................................................................................................

नांव – ए.बी. हंबर्डे,

वय – ३७ वर्षे,

नेमणुक – पो.ह. ९५४ गेवराई पोलीस स्टेशन,

.....................................................................................................

<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एस.ए.गायकवाड यांचेमार्फत सुरु</u> –

**०१.** दि. ०६/०६/२०२३ रोजी मी पोलीस ठाणे गेवराई येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. आम्ही वरिष्टांच्या आदेशान्वये रेवकी शिवारात पेट्रोलिंग करत असताना आम्हाला रेवकी फाटाच्या आत एक वाळुने भरलेला हायवा दिसून आला. माझ्यासोबत पोलीस उपनिरीक्षक भुतेकर, पो.ह. उबाळे, सहा.पो.फो.ए.बी.शेळके तेथे उपस्थित होते. आम्ही तो हायवा थांबवला. त्या हायवा चालकाला त्याचे नाव विचारले. त्याने त्याचे नाव अक्षय महादेव इंगडे, रा. बागपिंपळगाव असे सांगितले.

**०२.** त्या हायवामध्ये अंदाजे साडेपाच ब्रास वाळु मिळुन आली. त्याच्याकडे वाळु उपशाचा परवाना असल्याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यावेळी सहा.पो.फौ. शेळके यांनी दोन पंचासमक्ष सदरचा हायवा जप्त करुन त्याचा पंचनामा केला. सदर हायवा चा क्र. एम.एच.१४ जी.डी. ५३२८ असा होता. पंचनामा श्री शेळके यांनी केला. आरोपीविरुध्द त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये सरकारमार्फत फिर्याद दिलेली आहे.

**०३.** या गुन्हयाचे तपासकाम वरिष्टांच्या आदेशान्वये माझ्याकडे वर्ग झाले. त्यावेळी माझ्याकडे फिर्यादी जबाब, एफ.आय.आर. जप्ती पंचनामाची प्रत, मुद्येमाल

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.06.02 16:04:49 +0530

पावती देण्यात आली. त्यानंतर मी साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे तपासटिपण नोंदविले. आरेपीला फौजदरी प्रकिया संहिता कलम ४१–अ तसेच मोटार वाहन कायदा कलम २०६ अन्वयेदेखील नोटीस दिली. घटनास्थळी जावुन मी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. दि. ०६/०६/२०२३ रोजी ११.१० ते ११.५० या दरम्यान दोन पंच कैलास चक्कर व सोमनाथ चक्कर यांच्यासमक्ष घटनास्थळावर पंचनामा करण्यात आला. आता मला दाखवलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी आणि दोन्ही पंचाच्या सहया आहेत. त्यास **नि. १६** देण्यात येतो.

**०४.** त्यानंतर फिर्यादीने सर्वप्रथम फिर्याद देताना हायवाचा नोंदणी क्रमांक टंकलेखनाच्या चुकीमुळे चुकीचा नमुद झाल्याने व हायवा चालक आणि मालक हा एकच असल्याने त्यांचा पुरवणी जबाब नोंदविला. त्यामध्ये त्यांनी हायवाचा क्र. एम.एच.१४ जी.डी.५३२८ असा असल्याचे सांगितले. या वाहनाची कागदपत्रे मोटार परिवहन कार्यालय बीड यांच्याकडे मालकाचा पत्ता आणि इतर माहिती मिळण्याकरीता देण्यात आली. त्याचप्रमाणे तहसीलदार गेवराई यांना देखील गुन्हायमध्ये जप्त वाहनातील वाळुची तपासणी आणि रॉयल्टी पडताळणी होवून अभिप्राय मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. मला आता दाखवलेला पत्रव्यवहार तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आणि बरोबर आहे. त्याला **नि. १७** देण्यात येतो.

**०५.** आरोपी नोटीस देवूनदेखील हजर न राहिल्याने दि. २०/०६/२०२३ रोजी त्याला अटक करण्यात आली. तपासाअंती आरोपीने घटनेच्या दिवशी गेवराई ते गोंदी जाणा–या रोडवर त्याच्या ताब्यातील हायवा क्र. एम.एच.१४जी.डी.५३२८ मध्ये शासनाची रॉयल्टी चुकवुन विनापरवाना अंदाजे साडे पाच ब्रास वाळु वाहतुक करताना चोरुन घेवून जात असताना मिळून आला, त्याच्याकडे वैध वाहन चालवण्याचा परवाना नसताना गाडीच्या समोरील आणि मागिल बाजुस स्पष्ट नंबरप्लेट नसताना तसेच वाहनाचा विमा उतरवलेला नसताना चालवताना आढळुन आला. या

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.06.02 16:04:53 +0530

गुन्हयांखाली त्याच्याविरुध्द या न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपीला मी ओळखू शकतो. तो आज हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी तर्फे उलट तपास वकील श्री के.एस.वैद्य यांच्यातर्फे –**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, ठाणे दैनंदिनी नोंद केल्यावरच रात्रगस्त सुरु होते. तथाकथीत घटनेच्या दिवशी ठाणे दैनंदिनीला नोंद फिर्यादी श्री शेळके यांनी केली होती. त्याची प्रत पुराव्यामध्ये दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेळके यांनी वाहन जप्तीचा पंचनामा केला त्यावेळेस प्रथमखबरी अहवाल नोंद झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अशावेळी ठाणे दैनंदिनीला जी.डी.नंबर नमुद करणे आवश्यक असते. सदर हायवा जप्तीपंचनाम्यावर असा जी.डी.नंबर नमुद केला होता किंवा नाही याची माहिती मला नाही.

**०७.** तपासकाम वर्ग झाल्यानंतर फिर्यादीने माझ्याकडे मुद्येमाल जमा केल्याबाबत दस्त झाला नाही. घटनास्थळ पंचनाम्यातील पंचाना नोटीस देण्यात आली नव्हती. फिर्यादीने त्यांचा पुरवणीजबाब देताना कोणत्या कागदपत्रांना पडताळून गाडी नंबर दुरुस्त केला हे मला सांगता येणार नाही. मी सांगतो की गाडीवर जो नंबर नमुद होता त्याद्वारे दुरुस्ती केली. हे म्हणणे खरे आहे की, गाडीवरील नंबर बरोबर होता.

**०८.** तहसीलदार गेवराई यांना गोदावरी नदीपात्रात वाळु उपलब्धतेबाबत अहवाल देणे संदर्भात विचारणा झाली नव्हती. तपासकामामध्ये गोंदी गावातून नदीपात्रातून वाळु चोरी झाल्यचे निष्पन्न झाले होते. त्याच्याबाबत स्वतंत्र पंचनामा गोदावरी नदीपात्रात करण्यात आला नव्हता. पुरवणी जबाबात दुरुस्त केलेला गाडी नंबर तहसीलदार कार्यालयाला कळविण्यात आला नव्हता.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.06.02 16:04:57 +0530

**०९.** या घटनेसंदर्भात स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध झाले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तपासकाम खोटे केले असून खोटा पंचनामा केला आहे, खोटी तपासटिपणे नोंदविलेली आहेत, खोटे पत्रव्यवहार करण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुद्ध दोष निश्चित होत नसताना देखील खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत.**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.06.02 16:05:02 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. ०२/०६/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गेवराई**

**कोर्ट क्र.२**